10 NOV 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाने प्रशिक्षित विद्यार्थी दिल्यास सहकारामध्ये भरीव वाढ

## सतीश मराठे : वाणिज्य विभागाच्या बैठकीत मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : प्राथमिक सहकारी संस्थांच्या संगणकीकरणामुळे नव्या पिढीला रोजगार मिळू शकतो. त्यासाठी विद्यापीठ, महाविद्यालये यांनी सहकार प्रशिक्षित विद्यार्थी दिल्यास सहकारामध्ये भरीव वाढ होऊ शकते, असे प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे आयोजित विशेष बैठकीत त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. घटनादुरुस्तीद्वारे सहकारी बँका या रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली आल्या आहेत. केंद्र सरकारमध्ये सहकार मंत्रालय नव्याने स्थापन केले आहे. त्यामुळे येत्या काही वर्षांत संपूर्ण सहकार क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होणार आहेत, असे सतीश मराठे यांनी सांगितले.

सहकाराच्या यशस्वितेसाठी प्रशिक्षण आणि क्षमताबांधणी गरजेची आहे. विद्यापीठ विविध मार्गातून यासाठी प्रयत्नशील असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले. सामाजिक आर्थिक विकासाचे मॉडेल सहकारातूनच येऊ शकेल, असे मत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले. अधिसभासदस्य संजय परमणे, एस. जी. कुलकर्णी, अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. ज्ञानदेव तळूले चर्चेत सहभागी झाले. डॉ. आर. के. कामत, एम. एस. देशमुख, ए. एम. गुरव, प्रकाश पवार, दिनेश जंगम, नंदकुमार दिवटे आदी उपस्थित होते. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. के. व्ही. मारुलकर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.




शिवाजी विद्यापीठात सोमवारी भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी डावीकडून डॉ. श्रीकृष्ण महाजन, डी. टी. शिर्के, पी. एस. पाटील, विलास नांदवडेकर उपस्थित होते.

### सहकार क्षेत्र दुर्लक्षित राहिले

सुमारे साडेआठ लाख सहकारी संस्थांचे व्यापक जाळे भारतात असून, पाच कोटींहून अधिक सभासद, लाभार्थी आहेत. मात्र, त्यांच्या प्रशिक्षण, प्रबोधन करण्यास आजवर फारसे प्रयत्न झाले नाहीत. सहकाराकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टिकोन आणि ग्रामीण भागात अस्तित्व यामुळे सहकार क्षेत्र दुर्लक्षित राहिले आहे. याउलट परदेशामध्ये म्युच्युअल फंड, विमा, पर्यटन, वीजवितरण, आदी व्यवसाय सहकारी तत्त्वावर उत्तम चालत असल्याचे सतीश मराठे यांनी उदाहरणासह स्पष्ट केले. सहकारासाठी उपयुक्त कोर्सेस विद्यापीठाने सुरू करावेत. कोणते उपक्रम संयुक्तिक ठरतील त्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले.

लोकमत

# नवउद्योजकांना 'विद्यापीठात संधी

कोल्हापूर : कृषी, अभियांत्रिकी, अन्न व तंत्रज्ञान, औषध निर्माणशास्त्र, पर्यावरण व सामाजिक समस्यांचे निराकरण करू शकणाऱ्या आणि उद्योगात रूपांतर होऊ शकणाऱ्या कल्पना मांडणाऱ्या विद्यार्थी आणि नागरिकांना शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य' केंद्रातर्फे 'स्टार्ट-अप'ची संधी देण्यात येत आहे. इच्छुकांना प्रोटोटाइप निर्मिती, कंपनी नोंदणी, नवीन उत्पादन, विक्री नियोजन, व्यवसाय आराखडा, आदींबाबत मार्गदर्शन, आर्थिक मदत मिळणार आहे. इच्छुकांनी अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील 'नवनिर्मितीतून शाश्वत विकासाकडे' या नावावर क्लिक करून गुगल फॉर्म भरावा.

लोकमत

# २ हजार ८८ प्राध्यापकांच्या भरतीला मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयात रिक्त असलेल्या विविध विषयांच्या प्राध्यापकांची २ हजार ८८ पदे आणि प्राचार्यांची पदे भरण्यास मान्यता मिळाल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी जाहीर केले.

वरिष्ठ महाविद्यालयातील विविध विषयांची रिक्त पदे भरण्यास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्त्वाखालील बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील २ हजार ८८ पदे भरली जाणार असल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले. दरम्यान, विषयनिहाय आरक्षण धोरणानुसार भरती प्रक्रिया राबविल्यास मागास प्रवर्गातील उमेदवारांवर अन्याय होण्याची भीती काही घटकांकडून व्यक्त केली जात आहे. मंत्र्यांनी जाहीर केलेली पदभरतीसुद्धा न्यायालयात पोहोचण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

10 NOV 2021
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिवाळीत ध्वनिप्रदूषण वाढले

## आवाजाची पातळी मानांकनापेक्षा अधिक : शिवाजी विद्यापीठाकडून पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाचा कमी झालेला प्रादुर्भाव आणि निर्बंधांमधील शिथिलतेने यावर्षी कोल्हापूरकरांनी जोरात दिवाळी साजरी केली. लक्ष्मीपूजन, नरक चतुर्दशी एकाचदिवशी असल्याने नागरिक आणि व्यापारी, व्यावसायिकांनी फटाके उडविले. त्यामुळे आवाजाची पातळी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानांकनापेक्षा अधिक असल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाने केलेल्या पाहणीत दिसून आले.

औद्योगिक, व्यावसायिक, रहिवासी आणि शांतता क्षेत्रनिहाय शहरातील २२ ठिकाणी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने लक्ष्मीपूजन, पाडवा, भाऊबीज यादिवशी पाहणी केली. सायंकाळी सहा ते रात्री दहा या वेळेत ध्वनिप्रदूषणाच्या नोंदी घेतल्या. त्यामध्ये यंदा गेल्यावर्षीच्या तुलनेत ध्वनी प्रदूषणात वाढ झाल्याचे दिसून आले. आवाजाची पातळी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानांकनापेक्षा जास्त असल्याचे पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्रभारी प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी सांगितले. संशोधक विद्यार्थी चेतन. भोसले, एम. एस्सी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी ऋतुराज पिंगळे, सातविक शिंदे, विजय परीट, मनोज गुरव यांनी ध्वनी प्रदूषणाच्या नोंदी घेतल्या. त्यांना डॉ. पी. डी. राऊत, पल्लवी भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

### यंदाचा फटाक्यांचा आवाज (डेसिबलमध्ये)

| शहरातील परिसर | २०२१ | २०२० |
|---|---|---|
| सीपीआर | ५२.६१ | ५४.०० |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ५६.२६ | ५६.३७ |
| शिवाजी विद्यापीठ | ४९.७१ | ५१.१२ |
| राजारामपुरी (शांतता क्षेत्र) | ६५.७८ | ५५.०९ |
| उत्तेश्वर पेठ | ६०.७८ | ५८.५७ |
| शिवाजी पेठ | ६६.०१ | ५८.६८ |
| मंगळवार पेठ | ६२.५८ | ५६.७२ |
| ताराबाई पार्क | ६१.०५ | ५२.४३ |
| राजारामपुरी (व्यावसायिक क्षेत्र) | ६६.३८ | ६०.६३ |

| शहरातील परिसर | २०२१ | २०२० |
|---|---|---|
| शाहूपुरी | ६४.८६ | ६३.५३ |
| लक्ष्मीपुरी | ६१.०५ | ५९.७० |
| महाद्वार रोड | ७२.४७ | ६३.९७ |
| गुजरी कॉर्नर | ६५.९५ | ६४.१८ |
| पापाची तिकटी | ७२.७८ | ६८.७८ |
| बिनखांबी गणेश मंदिर परिसर | ६८.११ | ६३.४० |
| मिरजकर तिकटी | ६८.९३ | ५९.३५ |
| गंगावेश | ६३.७१ | ६०.३८ |
| बिंदू चौक | ६५.४३ | ६२.८८ |
| शिवाजी उद्यमनगर | ५९.१९ | ५९.०४ |

**क्षेत्रनिहाय रात्रीची मर्यादा अशा** (डेसिबलमध्ये)

| ७० | ५५ | ४५ | ४० |
|---|---|---|---|
| औद्योगिक | व्यावसायिक | रहिवासी | शांतता |



औद्योगिक, व्यावसायिक, रहिवासी आणि शांतता क्षेत्रनिहाय शहरातील **२२** ठिकाणी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने लक्ष्मीपूजन, पाडवा, भाऊबीज यादिवशी पाहणी केली.

10 NOV 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पत्रकारिता अध्यासनासाठी शासनाने निधी द्यावा : कुलगुरू

## पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव अध्यासनात आधुनिक अभ्यासक्रम सुरू करणार : सल्लागार समिती बैठकीत निर्णय

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठात स्थापन झालेले पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन हे पत्रकारितेतील देशातील पहिलेच अध्यासन आहे. सध्या डिजिटल युग आहे. यामुळे या अध्यासनात बदलत्या नवतंत्रज्ञानावर आधारित आधुनिक अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. याकरिता राज्य शासनाने जाहीर केलेला निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केली.

पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या सल्लागार समितीची मंगळवारी दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, समूह संपादक डॉ. योगेश जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि डॉ. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात बैठक झाली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन सल्लागार समितीच्या बैठकीत बोलताना दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव. यावेळी उपस्थित कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, 'पुढारी'चे समूह संपादक डॉ. योगेश जाधव, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, समिती सदस्य डॉ. रमेश जाधव, समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, उपअभियंता एम. के. पाटील. (छाया : पप्पू अत्तार)

डॉ. प्रतापसिंह जाधव म्हणाले, पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनासाठी स्वतंत्र इमारत होत आहे. या अध्यासनाच्या वतीने विविध उपक्रम सातत्याने राबविले जाणार आहेत. त्याकरिता अध्यासनासाठी शाश्वत निधीची आवश्यकता आहे. अध्यासनाला दरवर्षी निधी उपलब्ध झाला तर अध्यासनाचे कामकाज सुरळीतपणे सुरू राहणार आहे.

देशभरच नव्हे तर जगभर या अध्यासनाची ओळख निर्माण झाली पाहिजे, असे सांगत डॉ. जाधव म्हणाले, याकरिता या अध्यासनाबाबत वेगळा दृष्टिकोन आवश्यक आहे. त्यानुसार नवतंत्रज्ञानावर आधारित विविध उपक्रम सुरू होण्याची गरज आहे. त्यादृष्टीने अध्यासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची रूपरेषा निश्चित करा. दर तीन महिन्यांनी याबाबत बैठक घेऊन कामकाजाला गती द्या, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. योगेश जाधव म्हणाले, पत्रकारितेचे स्वरूप दिवसेंदिवस बदलत चालले आहे. सध्या डिजिटल युग आहे. यामुळे नवनवे तंत्रज्ञान येत आहे. अशा तंत्रज्ञानावर आधारित आणि आवश्यक अशा अभ्यासक्रमाची संधी अध्यासनाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली पाहिजे. प्रगत तंत्रज्ञान, जागतिक स्तरावरील पत्रकारितेतील नवे ट्रेंड, नवी साधने आदींची माहिती होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने दर दोन महिन्यांनी नवनवीन विषयांवरील कार्यशाळा आयोजित केल्या पाहिजेत. बदलत्या तंत्रज्ञानानुसार प्रात्यक्षिकांवर आधारित आणि रोजगारांची शाश्वती असणाऱ्या अभ्यासक्रमांना प्राधान्य द्या. त्यासाठी प्रगत अभ्यासक्रमांची यादी तयार करून त्यानुसार प्रमाणपत्र, पदविका, पदवी अशा स्वरूपात अभ्यासक्रम सुरू करा, अध्यासनाच्या वतीने स्टुडिओ उभा करावा, अशी सूचनाही डॉ. जाधव यांनी केली.

डॉ. शिर्के म्हणाले, सल्लागार समितीत आणखी तज्ज्ञांचा समावेश करा, त्यांच्यासमवेत बैठक घेऊन, नव तंत्रज्ञानावर आधारित प्रगत अभ्यासक्रमाची रूपरेषा निश्चित केली जाईल. त्यानुसार या अध्यासनात आधुनिक अभ्यासक्रम सुरू केले जातील, असेही त्यांनी सांगितले. अध्यासनासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाईल. यासह अध्यासनाच्या इमारतीत वर्ग सुरू करण्याबाबत आवश्यक साधनसामग्री तातडीने उपलब्ध करून दिली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत मास कम्युनिकेशन, जर्नालिझम विभाग आणि अध्यासन या संपूर्ण परिसराचे नियोजनबद्ध सुशोभिकरण करणे, पहिल्या टप्प्यातील बांधकाम पूर्ण झालेल्या अध्यासनाच्या इमारतीत आधुनिक अभ्यासक्रमाचे वर्ग सुरू करणे, अध्यासनाबाबत दर तीन महिन्यांतून एक बैठक घेणे, अध्यासनाचा माहितीपट तयार करणे आदी निर्णय घेण्यात आले. तत्पूर्वी डॉ. जाधव यांनी अध्यासनाच्या इमारतीच्या पहिल्या टप्प्यातील बांधकामाची पाहणी केली. आवश्यक सुविधांसह दुसऱ्या टप्प्यातील बांधकामाबाबत त्यांनी विविध सूचना केल्या.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत करून विषय पत्रिकेचे वाचन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, समिती सदस्य डॉ. रमेश जाधव, डॉ. रत्नाकर पंडित, प्रभारी उपकुलसचिव रणजित यादव यांच्यासह आर्किटेक्चर जीवन बोडके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता एम. के. पाटील उपस्थित होते.

पुढारी

# राज्यात प्राध्यापक भरतीचा मार्ग मोकळा

## २ हजार ८८ पदांची भरती

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

पहिल्या टप्प्यातील २ हजार ८८ प्राध्यापक भरतीला आणि सर्व प्राचार्य पद भरण्याला मान्यता देण्यात आली आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी ट्विटद्वारे ही माहिती दिली. गेली कित्येक वर्षे प्राध्यापक भरती प्रलंबित होती. भरतीसाठी राज्यात आंदोलनेदेखील करण्यात आली होती. गेल्या अकरा वर्षांपासून प्राध्यापक भरती नियमितपणे झालेली नाही. राज्यातील महाविद्यालयांतील पन्नास टक्के जागा रिक्त असल्याने शिक्षणावर परिणाम होत असल्याची भावना नेट-सेटधारकांनी व्यक्त केली होती.

पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा अर्ज प्रक्रियेस शुक्रवारपासून प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ च्या हिवाळी सत्रातील परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालये, अधिविभागात १२ नोव्हेंबरपासून अर्ज प्रक्रियेस प्रारंभ होणार आहे.

विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार १२ ते २६ नोव्हेंबर विनाविलंब शुल्क, २९ नोव्हेंबर ते २ डिसेंबरपर्यंत विलंब शुल्क व त्यानंतर ४ ते ७ डिसेंबरपर्यंत अतिविलंब शुल्क भरून विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहे. महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे २९ नोव्हेंबरपासून ९ डिसेंबरपर्यंत परीक्षा अर्जाच्या याद्या सादर करावयाच्या आहेत. सर्व अभ्यासक्रम व सत्र परीक्षांच्या तारखा व परीक्षा पद्धती लवकरच विद्यापीठाकडून जाहीर केली जाणार आहे.

10 NOV 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिवाळीत ध्वनी प्रदूषणात झाली वाढ

## शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाचे सर्वेक्षण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गतवर्षी दिवाळीत कोरोनामुळे नियंत्रणात आलेल्या ध्वनी प्रदूषणाने यंदा मात्र किमान आवाजाची मर्यादा ओलांडली. कोरोना प्रतिबंधक नियमांत मिळालेली शिथिलता, फटाक्यांचा कडकडाट आणि रस्त्यांवरील वर्दळ यामुळे शहरात ध्वनी प्रदूषणात वाढ झाल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या



पर्यावरणशास्त्र विभागाच्या पाहणी अहवालातून समोर आले आहे.

कोरोनामुळे गतवर्षी दिवाळी साजरी करण्याला मर्यादा होत्या. यंदा कोरोनाचा विळखा सैल होत असल्याने नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. यामुळे यावर्षी नागरिकांनी दिवाळी जल्लोषात साजरी केली. परिणामी, लक्ष्मीपूजनादिवशी घरगुती तसेच व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात फटाके उडवल्याने आवाजाची पातळी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निश्‍चित मानकापेक्षा जास्त आढळली.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शहरातील २२ ठिकाणी सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये पापाची तिकटी व महाद्वार रोड सर्वाधिक आवाजाची पातळी नोंदवली गेली आहे. औद्योगिक क्षेत्र असणाऱ्या वाय. पी. पोवार नगर व उद्यमनगरमध्ये आवाजाची पातळी निश्‍चित मानकाच्या आत होती.

### सायलंट झोनमध्ये प्रदूषणात किंचित घट

शहरातील सायलंट झोन असणाऱ्या सीपीआर रुग्णालय, न्यायालय परिसर, जिल्हाधिकारी कार्यालय, शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये प्रदूषणात किंचित घट झाली आहे. निश्‍चित मानकापेक्षा हे प्रमाण जास्त असले, तरी गतवर्षीच्या तुलनेत आवाजाची मर्यादा काहीअंशी कमी झाली आहे.

“

गेल्या दोन वर्षांमध्ये नागरिकांना कोरोनामुळे म्हणावी तशी दिवाळी साजरी करता आली नाही. कोरोना संसर्ग कमी झाल्यानंतर यंदा सर्वच घटकांनी दिवाळी सण उत्साहात साजरा केला. बाजारपेठांमधील वर्दळ, वाहनांची गर्दी, फटाके यामुळे आवाजाच्या पातळीत वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

**- डॉ. आसावरी जाधव,**
पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख,
शिवाजी विद्यापीठ

| सीपीसीबीचे निश्‍चित प्रमाण (डेसिबलमध्ये) | |
|---|---|
| सायलंट झोन - | ४० |
| नागरी वस्ती - | ४५ |
| व्यावसायिक - | ५५ |

**दिवाळीतील ध्वनी प्रदूषण (डेसिबलमध्ये)**

| ठिकाण | वर्ष २०२० | वर्ष २०२१ |
|---|---|---|
| (झोन : नागरी वस्ती) | | |
| राजारामपुरी- | ५५.०९ | ६५.७८ |
| उत्तरेश्‍वर पेठ - | ५८.५७ | ६०.७८ |
| शिवाजी पेठ - | ५८.६८ | ६६.०१ |
| मंगळवार पेठ- | ५६.७२ | ६२.५८ |
| ताराबाई पार्क- | ५२.४३ | ६१.०५ |
| नागाळा पार्क- | ५३.९२ | ५३.५३ |
| (झोन : व्यावसायिक) | | |
| राजारामपुरी- | ६०.६३ | ६६.३८ |
| शाहूपुरी- | ६३.५३ | ६४.८६ |
| लक्ष्मीपुरी- | ५९.७० | ६१.०५ |
| महाद्वार रोड- | ६३.९७ | ७२.४७ |
| गुजरी कॉर्नर- | ६४.१८ | ६५.९५ |
| पापाची तिकटी- | ६८.७८ | ७२.७८ |
| बिनखांबी - | ६३.४० | ६८.११ |
| मिरजकर तिकटी- | ६२.८८ | ६५.४३ |
| गंगावेस- | ६०.३८ | ६३.७१ |
| बिंदू चौक- | ६२.८८ | ६५.४२ |

10 NOV 2021
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकाराच्या प्रगतीत शिक्षण संस्थांचे मोठे योगदान

## आरबीआयचे संचालक सतीश मराठे : शिवाजी विद्यापीठ वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभागाची बैठक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

घटनादुरुस्तीद्वारे सहकारी बँका या रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली आल्या आहेत, तसेच केंद्र सरकारमध्ये नव्याने सहकार मंत्रालय स्थापन करण्यात आले आहे. या दोन घटनांमुळे येत्या काही वर्षांत संपूर्ण सहकार क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होणार असून, या क्षेत्रात होऊ घातलेल्या प्रगतीमध्ये शिक्षण संस्था भरीव योगदान देऊ शकतात, असे मत भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठामध्ये वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या वतीने आयोजित बैठकीत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के होते.

मराठे म्हणाले, सुमारे साडेआठ लाख सहकारी संस्थांचे व्यापक जाळे भारतात असून, ५ कोटींहून अधिक सभासद व लाभार्थी आहेत; परंतु या सर्वांचे प्रशिक्षण व प्रबोधन करण्याचे प्रयत्न झाले नाहीत. सहकाराकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन व ग्रामीण भागात अस्तित्व यामुळे सहकार क्षेत्र दुर्लक्षित राहिले आहे. याउलट परदेशामध्ये म्युच्युअल फंड, विमा, पर्यटन, वीज वितरण असे अनेक व्यवसाय सहकारी तत्त्वावर उत्तम चालत असल्याचेही त्यांनी सांगितले. सहकारी संस्थांच्या संगणकीकरणामुळे नव्या पिढीला रोजगार मिळू शकतो. सहकारासाठी उपयुक्त कोर्सेस विद्यापीठाने सुरू करावेत, याविषयी मार्गदर्शन केले.

कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचीही भाषणे झाली. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत केले. यावेळी अधिसभा सदस्य संजय परमणे, एस. जी. कुलकर्णी व अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. ज्ञानदेव तळुले यांनीही चर्चेत सहभाग घेतला.

पुण्यनगरी

# प्राध्यापक भरतीला मान्यता -उदय सामंत

**मुंबई :** राज्यात पहिल्या टप्प्यातील २०८८ प्राध्यापक भरतीला आणि सर्व प्राचार्य पदे भरण्याला मान्यता देण्यात आल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी ट्विटद्वारे दिली आहे. राज्यातील प्राध्यापक भरती प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करा, अशी मागणी गेल्या काही महिन्यांपासून करण्यात येत होती, त्यासाठी आंदोलनदेखील करण्यात आले होते.

▶▶ पान ७ वर

# प्राध्यापक भरतीला मान्यता - उदय सामंत

(पान १ वरुन) त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. उदय सामंत यांनी ट्विट करून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या भरतीला मान्यता दिल्याची माहिती दिली आहे.

त्यानुसार आता प्राध्यापकांच्या पहिल्या टप्प्यातील २,०८८ प्राध्यापक भरतीला आणि सर्व प्राचार्य पद भरण्यास मान्यता मिळाली आहे. लवकरच या भरती प्रक्रियेची सुरुवात होण्याची शक्यता आहे.

10 NOV 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फटाकेमुक्त दिवाळीचा 'फुसका बार'; आवाजाच्या पातळीत वाढ

## शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे निरीक्षण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दिवाळी सणामध्ये गतवर्षीच्या आवाजाच्या पातळीपेक्षा वाढ झाल्याचे निरीक्षण शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने नोंदवले आहे. शहरातील शांतता क्षेत्र, रहिवासी क्षेत्र, व्यावसायिक परिसर, तसेच औद्योगिक परिसरामध्ये हा अभ्यास करण्यात आला. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी गर्दी व फटाक्यांच्या आवाजामुळे आवाजाची पातळी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकापेक्षा जास्त असल्याचे समोर आले. यामुळे यावर्षीही फटाकेमुक्त दिवाळीच्या चळवळीला खो बसला आहे.



प्रतिवर्षी दिवाळी सणामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागातर्फे शहरातील विविध परिसरामध्ये आवाजाच्या पातळीचे मापन करण्यात येते. गतवर्षी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आवाजाची पातळी कमी होती. यंदा मात्र कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने आवाजाच्या पातळीमध्ये वाढ झाली. या पाहणीमध्ये रहिवासी क्षेत्रामध्ये राजारामपुरी परिसरामध्ये गतवर्षी ५५.९, तर या वर्षी ६५.७८ अशी तब्बल १० टक्क्यांहून अधिकची वाढ झाली. व्यावसायिक क्षेत्रामध्ये मिरजकर तिकटी भागात गतवर्षी ५९.३५, तर या वर्षी ६८.९३ डेसिबल म्हणजे तब्बल ९.५८ टक्के अधिक आवाजाची पातळी होती. औद्योगिक क्षेत्रामध्ये गतवर्षीपेक्षा आवाजाची पातळी काहीअंशी कमी होती. पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. आर. भोसले, एन. बी. पोखर्णीकर या प्राध्यापकांसह चेतन भोसले, ऋतुराज पिंगळे, सात्विक शिंदे, विजय परीट, मनोज गुरव या विद्यार्थ्यांनी ही निरीक्षणे नोंदवली.

### शांतता क्षेत्रामध्ये आवाज कमी

इतर क्षेत्रामध्ये आवाजाच्या पातळीमध्ये गतवर्षीपेक्षा वाढ झालेली दिसत असली तरी शांतता क्षेत्रामध्ये पातळीमध्ये घट झाली आहे. यामध्ये सीपीआर परिसरामध्ये गतवर्षी ५४, तर यंदा ५२.६९, न्यायालय परिसरामध्ये गतवर्षी ५४.७९, तर या वर्षी ५४.०४, जिल्हाधिकारी कार्यालय परिसरामध्ये ५६.३७, तर यावेळी ५६.२८, शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये ५१.९२, तर या वर्षी ४९.७१ डेसिबल अशी आवाजाची पातळी आहे. मात्र गतवर्षीपेक्षा पातळीमध्ये घट झाली असली तरी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकापेक्षा ही जास्त आहे. सीपीसीबीच्या मानकानुसार रात्रीच्या वेळच्या आवाजाची पातळी ४५ डेसिबल असणे आवश्यक आहे.

10 NOV 2021
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकारासाठी शिक्षण संस्थांचे योगदान आवश्यक

## रिझर्व्ह बँक संचालक सतीश मराठे; विद्यापीठातील विशेष बैठकीत मंथन




**कोल्हापूर : विद्यापीठातील विशेष बैठकीत बोलताना सतीश मराठे.**

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ९ : "घटनादुरुस्तीद्वारे सहकारी बँका या रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली आल्या. केंद्र सरकारने सहकार मंत्रालय नव्याने स्थापन केले. यामुळे आगामी वर्षात सहकार क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होणार आहेत. सहकाराच्या प्रगतीमध्ये शिक्षण संस्था भरीव योगदान देऊ शकतात," असे मत भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठामध्ये वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाने आयोजित केलेल्या विशेष बैठकीत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के होते.

यावेळी मराठे म्हणाले, "देशभरात सुमारे साडेआठ लाख सहकारी संस्था, ५ कोटींहून अधिक सभासद व लाभार्थी आहेत. परंतु या सर्वांचे प्रशिक्षण व प्रबोधन करण्यास आजवर फारसे प्रयत्न झाले नाहीत. सहकाराबाबत नकारात्मक दृष्टिकोन राहिला. विद्यापीठ व महाविद्यालयांनी सहकार प्रशिक्षित विद्यार्थी उपलब्ध केल्यास सहकारात भरीव वाढ होऊ शकते. त्यासाठीचे कोर्स विद्यापीठाने सुरू करावेत." अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "सहकाराच्या यशस्वीतेसाठी प्रशिक्षण व क्षमता बांधणी गरजेची असून विद्यापीठ यासाठी प्रयत्नशील आहे. सहकाराच्या विकासासाठी विद्यापीठ प्रयत्न करेल." याप्रसंगी अधिसभा सदस्य संजय परमणे, एस. जी. कुलकर्णी, अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. ज्ञानदेव तळूले यांनी चर्चेत भाग घेतला. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी सूत्रसंचालन केले. विज्ञान शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. आर. के. कामत, डॉ. एम. एस. देशमुख, प्रा. डॉ. ए. एम. गुरव, प्रा. प्रकाश पवार, अधिसभा सदस्य दिनेश जंगम, नंदकुमार दिवटे व प्राध्यापक उपस्थित होते.

सकाळ

# स्टार्टअपची नोंदणी करण्याचे आवाहन



कोल्हापूर : कृषी, अभियांत्रिकी, अन्न व तंत्रज्ञान, औषध निर्मितीशास्त्र, पर्यावरण आणि सामाजिक समस्या यावरील स्टार्टअपची नोंदणी महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी व शिवाजी विद्यापीठाच्या नवसंशोधन व साहचर्य केंद्राकडे करावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाने केले आहे. नोंदणी करणाऱ्यांनी मंगळवारी (ता.२३) सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागात (डी.ओ.टी) उपस्थित रहायचे आहे. नोंदणी करण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) न्यूज अँड इव्हेंट सदरामध्ये 'नवनिर्मितीतून शाश्वत विकासाकडे' या नावावर क्लिक करावे. त्यातील रजिस्ट्रेशन लिंकवर क्लिक करून गुगल फॉर्म भरावा. निवड केलेल्या स्टार्टअपना केंद्राकडून स्टार्टअपसाठी प्रोटोटाईप निर्मिती, कंपनी नोंदणी, नवीन उत्पादने, विक्री नियोजन, व्यवसाय आराखडा, याबाबत मार्गदर्शन दिले जाणार आहे. आर्थिक मदतही मिळणार आहे. अधिक माहितीसाठी ०२३१ -२६०९०८७ या क्रमांकावर संपर्क करावा.

10 NOV 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहरात ध्वनी प्रदूषणात वाढ

## दिवाळीतील फटाके; विद्यापीठाच्या 'पर्यावरणशास्त्र'चे सर्वेक्षण

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : दिवाळीच्या तीन दिवसांमध्ये फटाके, माणसांचा गोंगाट यामुळे ध्वनी प्रदूषणात वाढ झाली आहे. शांतता, रहिवासी, व्यापारी आणि औद्योगिक अशा सर्वच क्षेत्रात ध्वनीची तीव्रता निर्धारित पातळीपेक्षा जास्त आहे. खरेदीसाठी रस्त्यावर आलेल्या लोकांचा गोंगाट आणि फटाके यामुळे ध्वनीची पातळी वाढल्याचे सर्वेक्षणात दिसते. शांतता क्षेत्रात ध्वनीची पातळी ४० डेसिबल पेक्षा कमी असावी लागते. रहिवासी क्षेत्रात ४५ तर व्यापारी क्षेत्रात ५५ डेसिबल पेक्षा कमी ध्वनी पातळी निर्धारीत केली आहे.



औद्योगिक क्षेत्रात ध्वनीची पातळी ७० डेसिबलपर्यंत निश्‍तित केली आहे. सर्वच ठिकाणी यंदा निश्‍चित केलेल्या ध्वनी पातळीपेक्षा अधिक आहे.

हे सर्वेक्षण शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण शास्त्र विभागाने केले आहे. डॉ. असावरी जाधव, प्रा. डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. आर. भोसले, संशोधक विद्यार्थी एन. बी. पोखरणीकर, विद्यार्थी चेतन भोसले, ऋतुराज पिंगळे, स्वस्तिक शिंदे, विजय परीट, मनोज गुरव यांनी हे सर्वेक्षण केले.

### औद्योगिक क्षेत्रात पातळी कमी

दिवाळीच्या कालावधीत औद्योगिक वसाहतींमध्ये माणसांची वर्दळ कमी असते. येथे फारसे फटाकेही वाजत नाहीत. त्यामुळे या परिसरात ध्वनीची पातळी निर्धारीत पातळीपेक्षा कमी आहे.

> "यंदा दिवाळी तीन दिवस होती. त्यात नरक चतुर्दशी आणि लक्ष्मीपूजन एकाच दिवशी आले होते. त्यामुळे रहिवासी आणि व्यापारी क्षेत्रात फटाके उडवले गेले. त्यामुळे निर्धारित पातळीपेक्षा ध्वनीची पातळी वाढली असल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले.
> - आसावरी जाधव,
> विभाग प्रमुख, पर्यावरणशास्त्र विभाग

**ध्वनीची पातळी पुढीलप्रमाणे**

| क्षेत्र | परिसराचे नाव | २०२१ | २०२० |
|---|---|---|---|
| शांतता | सीपीआर | ५२.६९ | ५४.०० |
| | न्यायालय | ५४.०४ | ५४.७९ |
| | शिवाजी विद्यापीठ | ४९.७१ | ५१.१२ |
| रहिवासी | राजारामपुरी | ६५.७८ | ५५.०९ |
| | शाहूपुरी | ६४.८६ | ६३.५३ |
| | लक्ष्मीपुरी | ६१.०५ | ५९.७० |
| | महाद्वार रोड | ७२.४७ | ६३.९७ |
| | गुजरी कॉर्नर | ६५.९५ | ६४.१८ |
| | पापाची तिकटी | ७२.७८ | ६८.७८ |
| | बिनखांबी गणेश मंदिर | ६८.११ | ६३.४० |
| | मिरजकर तिकटी | ६८.९३ | ५९.३५ |
| | गंगावेश | ६३.७१ | ६०.३८ |
| | बिंदू चौक | ६५.४३ | ६२.८८ |
| औद्योगिक क्षेत्र | उद्यमनगर | ५९.१९ | ५९.०४ |
| | वाय.पी.पोवार नगर | ५६.०५ | ६०.०५ |

तरूण भारत

# जागतिक संशोधकांच्या यादीत डॉ. व्हनाळकर यांचा समावेश

प्रतिनिधी
गारगोटी

अमेरिकेतील स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी आणि नेदरलँड मधील एल्सेव्हियर बीव्ही प्रकाशन कंपनी यांनी सयुंक्तपणे जगातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची यादी जाहीर केली आहे. या यादीमध्ये श्री मौनी विद्यापीठ संचलित कर्मवीर हिरे महाविद्यालयातील डॉ. एस. ए. व्हनाळकर यांचा समावेश झाला आहे. त्यांना उपयोजित भौतिकशास्त्र आणि पदार्थ विज्ञान या क्षेत्रातील संशोधनकार्याच्या आधारावर यादीमध्ये स्थान मिळाले आहे.

मागील वर्षीपासून स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीने मूलभूत शास्त्र, शेती, वैद्यकीय, औषधनिर्माण, अभियांत्रिकीसह वैज्ञानिक अभ्यासाच्या




सुमारे २०० हून अधिक क्षेत्रामध्ये कार्यरत संशोधकांचा अभ्यास करून ही यादी तयार केली आहे. या यादीमध्ये डॉ. व्हनाळकर हे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयीन स्तरावर कार्यरत असणारे एकमेव संशोधक आहेत. त्यांना संस्था अध्यक्ष ना. सतेज पाटील, चेअरमन आशिष कोरगांवकर, संचालक डॉ. बेलेकर, शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील यांचे सहकार्य लाभले.

10 NOV 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गतवर्षीपेक्षा यंदा ध्वनीप्रदूषणात वाढ



## विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागातर्फे फटाक्यांच्या आवाजाचे सर्वेक्षण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे दरवर्षी दीपावलीमध्ये फटाक्यांच्या आवाजाची पातळी मोजली जाते. गतवर्षी कोरोनामुळे दिवाळीत फटाक्यांचा आवाज कमी होता. यंदा मात्र मानांकनापेक्षा डेसीबलमध्ये वाढ झाल्याचे अहवालावरून निदर्शनास येते. यामध्ये वाहनांचा आवाज, बाजारातील माणसांची वर्दळ आणि फटाक्यांच्या आवाजांचा समावेश आहे.

पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे तपासलेल्या अहवालानुसार



औद्योगिक क्षेत्राबरोबरच रहिवासी क्षेत्रात देखील ध्वनी प्रदूषणाची पातळी मोजली जाते. यंदा आवाजाची पातळी मानांकनापेक्षा अधिक असून गतवर्षीपेक्षा जवळपास १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. दीपावलीमध्ये रहिवासी, व्यावसायिक, औद्योगिक व शांत (सायलेंट) क्षेत्रातील फटाक्यांची ध्वनी पातळी मोजली आहे. मानांकनाप्रमाणे औद्योगिक क्षेत्रात दिवसा ७५ व रात्री ७० डेसीबल, व्यावसायिक क्षेत्रात दिवसा ६५ व रात्री ५५, रहिवासी क्षेत्रात दिवसा ५५ व रात्री ४५ तसेच शांत (सायलेंट) क्षेत्रात दिवसा ५० व रात्री ४० डेसिबल असावे, असा नियम आहे. शिवाजी विद्यापीठाने मोजलेल्या ध्वनी पातळीत दरवर्षीच्या तुलनेत वाढ झाल्याने पर्यावरण प्रेमींकडून नाराजी व्यक्त होत आहे.

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागाने लक्ष्मीपूजन दिवशी घेतलेल्या डेसीबलचे प्रमाण

| क्षेत्र | क्षेत्राचे नाव | २०२० (डेसीबल) | २०२१ (डेसीबल) |
|---|---|---|---|
| रहिवासी क्षेत्र | राजारामपुरी | ५५.०९ | ६५.७८ |
| | शिवाजी पेठ | ५८.६८ | ६६.०१ |
| | उत्तरेश्वर पेठ | ५८.५७ | ६०.७८ |
| | मंगळवार पेठ | ५६.७२ | ६२.५८ |
| | ताराबाई पार्क | ५२.४३ | ६१.०५ |
| | नागाळा पार्क | ५३.९२ | ५३.५३ |
| व्यावसायिक क्षेत्र | राजारामपुरी | ६०.६३ | ६६.३८ |
| | शाहुपूरी | ६३.५३ | ६४.८६ |
| | लक्ष्मीपुरी | ५९.७ | ६१.०५ |
| | महाव्दार रोड | ६३.९७ | ७२.४७ |
| | गुजरी कॉर्नर | ६४.१८ | ६५.९५ |
| | पापाची तिकटी | ६८.७८ | ७२.७८ |
| | बिनखांबी गणेश मंदिर | ६३.४ | ६८.११ |
| | मिरजकर तिकटी | ६८.७८ | ७२.७८ |
| | गंगावेश | ६०.३८ | ६३.७१ |
| | बिंदुचौक | ६२.८८ | ६५.४३ |
| शांत(सायलेंट) क्षेत्र | सीपीआर चौक | ५४ | ५२.६९ |
| | कोर्ट | ५४.७९ | ५४.०४ |
| | जिल्हाधिकारी कार्यालय | ५६.३७ | ५६.२६ |
| | शिवाजी विद्यापीठ | ५१.१२ | ४९.७१ |
| औद्योगिक | वाय. पी. पवार नगर | ५९.०४ | ५९.१९ |
| | उद्यमनगर | ६०.०५ | ५६.०५ |